जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरन, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

---

दुरध्वनी-०२४४२-२२२६०४ Email.rdc.beed२@gmail.com

---

क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापण/कारोना विषाणु/कावी- दि.३०.०३.२०२०

विषय :- जिल्ह्यात कोरोना विषाणु(COVID १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपायोजना करुन जिवनावश्यक शेतमालाचे खरेदी विक्री व्यवहार सुरु ठेवणेबाबत.

संदर्भ:-१.सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.कोरोना-२०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य-५/ दि.१४.०३.२०२०.

२.मा.प्रधान सचिव, सार्वजनीक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र जा.क्र.कोरोना/२०२० /प्र.क्र.५८/आरोग्य -५/दि.१५.०३.२०२०,

३.साथरोग प्रतिबंधक कायदा,१८९७ कलम ०२,०३ व ०४

४. मा.पणन संचालक, पणन सचालनालय , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे परीपत्रक जा.क्र. पणन -५ / परीपत्रक/१४७/सन २०२०, दि.१६.०३.२०२०

५. मा.पणन संचालक, पणन सचालनालय , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे परीपत्रक जा.क्र. पणन -५ / परीपत्रक१००७/सन २०२०, दि.१९.०३.२०२०.

६. मा.पणन संचालक, पणन सचालनालय , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे परीपत्रक जा.क्र. पणन -५ / परीपत्रक/कारोना प्रतिबंधक उपायोजना/१०२४/सन २०२०, दि.२३.०३.२०२०.

७. मा.पणन संचालक, पणन सचालनालय , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे परीपत्रक जा.क्र पणन -५ / परीपत्रक/कारोना प्रतिबंधक उपायोजना/१०२६/सन २०२०, दि.२३.०३.२०२०.

८. मा.पणन संचालक, पणन सचालनालय , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे परीपत्रक जा.क्र. पणन -५ / परीपत्रक/कारोना प्रतिबंधक उपायोजना/१०२७/सन २०२०, दि.२४.०३.२०२०.

९.महाराष्ट्र शासन अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR.९२/dis M-१, दि.२५.०३.२०२०.

१०. मा.पणन संचालक, पणन सचालनालय , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे परीपत्रक जा.क्र. पणन -५ / परीपत्रक/कारोना प्रतिबंधक उपायोजना/१०२९/सन २०२०, दि.२६.०३.२०२०.

११. मा.पणन संचालक, पणन सचालनालय , महाराष्ट्र राज्य , पुणे यांचे परीपत्रक जा.क्र पणन -५ / परीपत्रक/कारोना प्रतिबंधक उपायोजना/१०३०/सन २०२०, दि.२७.०३.२०२०.

आदेश:-

ज्याअर्थी, संदर्भ क्र.०३ अन्वये मा.प्रधान सचिव,सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दि.१३.०३.२०२० पासून लागु करुन खंड ०२,०३, व ०४ मधील तरतुदीनुसार दि.१४.०३.२०२० रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे,

त्यामुळे साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे, त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित केले आहे.

तसेच मा.पणन संचालक, पणन संचालनालय, माहाराष्ट्र राज्य पुणे यांनी त्यांचे कार्यालयीन परिपत्रक संदर्भ क्र.१० व ११ अन्वये खालील नमुद सुचना विचारात घेवुन जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होणार नाही याची दक्षता घेवुन जीवनावश्यक शेत मालाचे खरेदी विक्रीचे कामकाज सुरळीत

Scanned by CamScanner

चालु राहील यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही व उपाययोजना करणेबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने बीड जिल्ह्यात कोरोणा विषाणूचा (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी व जिवनावश्यक शेतमालाची खरेदी विक्रीचे कामकाज सुरळीत चालु राहण्या संदर्भात खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत:-

१. कोरोना रोगासंबंधी जनजागृती होण्यासाठी बाजार क्षेत्रात लोकांना कोरोना रोगापासून काळजी घेणे बाबत फलक/उद्घोषणा याद्वारे आवाहन करावे व आवश्यक ती माहिती द्यावी.
२. बाजार समिती कार्यक्षेत्रातील बाजार व उपबाजार क्षेत्रातील परीसरामध्ये ठिक-ठिकाणी कोरोणा रोगासंबंधीच्या माहिती बाबतचे मार्गदर्शक फलक लावण्यात यावे.
३. बाजार समितीमध्ये येणाऱ्या व्यक्ती व बाजार घटकांचा प्रवेश नियंत्रीत करण्यासाठी प्रवेश द्वार निश्चित करुन त्यामधूनच त्यांना प्रवेश देण्यात यावा.
४. बाजार आवारात येण्याऱ्या व्यक्ती व बाजार घटक त्यांचे चेहऱ्यावर मास्क लावतील याकडे बाजार समितीने जाणीवपुर्वक लक्ष द्यावे आणि बाजार आवारात येणाऱ्या व्यक्तीसाठी प्रवेश द्वाराजवळच हात निर्जंतुकीकरणासाठी सॅनिटायझर्सची व्यवस्था करण्यात यावी.
५. बाजार आवारात असणाऱ्या स्वछता गृहांची स्वच्छता वारंवार करण्यात येवुन ते जास्तीत जास्त निर्जंतुक राहिल याची दक्षता घ्यावी आणि सार्वजनिक स्वछता ठेवण्याकडे संपुर्णपणे लक्ष ठेवण्यात यावे.
६. बाजार समितीमध्ये येणाऱ्या व्यक्ती तसेच बाजार घटकांचे थर्मल टॅंपरेचर स्कॅनरद्वारे स्क्रिनिंग करण्यात यावे .

यावे.

७. बाजार आवारातील अनावश्यक गर्दी होणार नाही याची दक्षता घेऊन सर्व घटकांना हात धुण्यासाठी बाजार समितीच्या बाजार आवारात पुरेशा प्रमाणात पाण्याच्या नळाची व्यवस्था करावी आणी त्या ठिकाणी हॅण्डवॉश / सॅनिटायझर इ. सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात व बाजार घटकांना त्याचा वापर करण्याबाबत सुचना द्याव्यात.

८. कृषी उत्पन्न बाजार समित्यांना बाजार आवारात कार्यरत राहणाऱ्या व्यक्तींचा प्रवेश अत्यंत मर्यादित ठेवावा. अनावश्यक व विनाकारण बाजारात कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही परिस्थितीत प्रवेश देऊ नये.

९. बाजारात वावरणाऱ्या व्यक्ती किमान ३ फुट अंतरावर राहतील याची दक्षता घ्यावी. व याबाबत वारंवार फलक / उद्घोषणाद्वारे आवाहण करण्यात यावे.

१०. बाजार आवारात असणाऱ्या कॅन्टीनची व त्यामध्ये असणाऱ्या स्वयंपाक गृहाची वारंवार स्वच्छता करण्यात यावी.

११. बाजार आवारात उपस्थित असणाऱ्या व्यक्तींनी खाद्य पदार्थ खाण्यापुर्वी हात स्वच्छ धुवावेत, यासाठी त्यांना प्रवृत्त करावे.

१२. बाजार समितीमध्ये उचित काळजी घेवुन जिवनावश्यक वस्तुची खरेदी विक्री / बाजार सुरु ठेवण्यात यावे. तथापी गुरांचे बाजार व अन्य जिवनावश्यक नसलेल्या बाबींचे व्यवहार बंद ठेवण्यात यावे.

१३. बाजार आवारात सर्दी, ताप, खोकला असणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यात यावा. तसेच अशी व्यक्ती आढळुन आल्यास त्वरीत संबंधित यंत्रणेस कळवावे.

१४. बाजार समितीने आवश्यकतेनुसार मास्क, सॅनिटायझर्स, औषधी साबन ईत्यादींची खरेदी करुन त्याचा वापर करावा.

१५. बाजार संपल्यानंतर तसेच रात्रीच्या वेळी बाजार आवारात स्वछता, औषध फवारणी करुन बाजार आवार जास्तीत जास्त निरजंतुक राहील याची दक्षता घेण्यात यावी आणि बाजार आवारात निर्माण होणाऱ्या कचऱ्यांची विल्हेवाट तात्काळ करण्यात यावी.

Scanned by CamScanner

१६. बाजार आवारात सार्वजनीक स्वछता राहील यासाठी दररोज बाजार संपल्यानंतर सोयीची वेळ निश्चित करुन बाजार आवारात सोडीयम हायपोक्लोराईड स्प्रेचा किंवा अन्य रसायनाचा वापर करावा याबाबत अधिक माहिती करीता स्थानिक महानगर पालिका/ नगर पालिकेच्या आरोग्य विभागाशी संपर्क साधावा.

१७. बाजार आवारात कमीतकमी गर्दी राहील या दृष्टीने आपले स्तरावर योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात. सदर कामी पालीस यंत्रणेची तातडीने मदत घेवुन बाजार आवारात कमीत कमी गर्दी होईल याची खबरदारी घ्यावी.बाजार समितीने अवश्यकतेनुसार व्यापारी हमाल, मापाडी इत्यादी बाजार घटकांना सफाई कर्मचाऱ्यांना तसेच बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना ओळखपत्र द्यावे जेणेकरुन त्यांना बाजार आवारात येण्यास अडचण येणार नाही.

१८. बाजार आवारामधे शेतमालाची एकदम आवक होणार नाही व बाजार आवारात ऐकदम गर्दी होणार नाही या दृष्टीने संबंधित बाजार घटकांची समन्वय ठेऊन आपले स्तरावर नियोजन व अंमल करावा.

१९. बाजार समितीने जीवनावश्यक वस्तुंची वाहतुक करणाऱ्या वाहनांना प्रमाणपत्र द्यावे. जेणेकरुन त्या वाहनांना जीवनावश्यक वस्तुंची वाहतुक करण्यास अडचन येणार नाही.

२०. काही बाजार घटकांनी कामकाज सुरु न ठेवल्यास बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आवक झालेला शेतमाल आणि घाऊक खरेदीदार यांचा समन्वय करुन खरेदी विक्री सुरु राहिल यासाठी बाजार समितीने समन्वयक म्हणुन कामकाज करावे आणि आवश्यक त्या उपाय योजना कराव्यात .

उपरोक्त बाबी विचारात घेऊन बीड जिल्यातील सर्व बाजार समित्यांनी त्यांचे बाजार आवारामध्ये कोरोणा विषाणूचा प्रादुर्भाव होणार नाही, याची दक्षता घेवुन जीवनावश्यक शेतमालाचे खरेदीविक्रीचे कामकाज सुरळीत राहील यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही व उपाययोजना त्यांचे स्तरावर करावी.

3/10/20

(राहुल रेखावार, भाप्रसे)
जिल्हाधिकारी, बीड
तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, बीड

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी:-

१. सभापती / सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती (------सर्व-----) जि, बीड.
२. उप/ सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता.(------सर्व----) जि.बीड
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड.

प्रत माहितीस्तव:-